मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रकल्प प्रमुख आणि सेफ्टी ऑफिसर्सवर अखेर गुन्हा दाखल...

## मोशी दुर्घटनेच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय तांत्रिक समिती गठित

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील कचरा डेपो परिसरात झालेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी अखेर मोठी कायदेशीर कारवाई केली आहे. महापालिकेच्या वतीने भोसरी पोलीसठाण्यात अधिकृत फिर्याद देण्यात आली असून,'अॅटोनी लारा रिन्यूएबल एनर्जी प्रा. लि.'कंपनीचे प्रकल्प प्रमुख अशोककुमार सियाराम शरण गुप्ता आणि सेफ्टी अधिकारी विजय रामराव सपकाळ यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना न केल्यामुळे ९ निष्पाप कामगारांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा गंभीर आरोप या दोघांवर ठेवण्यात आला आहे.



मोशी कचरा डेपोच्या आवारात असलेल्या 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीजवळ ८ जुलै २०२६ रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास ही भयानक दुर्घटना घडली. अचानक कचऱ्याचा एक प्रचंड ढिगारा शेजारील इमारतीवर आणि रस्त्यावर कोसळला. हा ढिगारा इतका मोठा होता की, तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. या ढिगाऱ्याखाली अनेक जण गाडले गेले आणि त्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला.

या भीषण दुर्घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ (NDRF), भारतीय सैन्य, महापालिकेचे अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांनी युद्धपातळीवर बचाव मोहीम हाती घेतली. तब्बल ८४ तास अविरतपणे चाललेल्या या शोधमोहिमेनंतर ढिगाऱ्याखालून ९ कामगारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

प्राथमिक शवविच्छेदन अहवालानुसार, कामगारांचा मृत्यू गुदमरून न होता, प्रचंड अंतर्गत रक्तस्त्राव आणि मल्टिपल फ्रॅक्चरमुळे झाल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे कंपनीच्या सुरक्षितता व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवले जात आहे. या दुर्घटनेत १२ जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बचाव पथकाने ९ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश मिळवल

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक तपासणीत संबंधित कंत्राटदार कंपनीने घटनास्थळी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवल्याचे निष्पन्न झाले आहे. कचऱ्याच्या डोंगराचे योग्य व्यवस्थापन न करणे, संभाव्य भूस्खलन रोखण्यासाठी संरक्षक भिंत किंवा आवश्यक उपाययोजना न करणे आणि कामगारांच्या सुरक्षेसाठी नियुक्त सुरक्षा अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यांमुळेच ही दुर्घटना घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या ढिसाळ कारभारामुळे ९ कामगारांना आपला जीव गमवावा लागला.

घटनेचे गांभीर्य ओळखून महापालिका आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेत दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार प्रशासनाने तातडीने पावले उचलत भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलीस आता संबंधित अधिकाऱ्यांना अटक करण्याची शक्यता असून पुढील तपास अत्यंत वेगाने सुरू आहे.

# महापालिकेत झळकणार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, दिवंगत अजितदादा व लक्ष्मणभाऊ यांची तैलचित्रे..!

## स्थायी समितीच्या मंजुरीनंतर प्रत्यक्ष कामाला होणार सुरुवात; सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकाराला यश

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तसेच राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार, माजी आमदार दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव गुरुवारी (दि.१६) होणाऱ्या स्थायी समितीच्या सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकारामुळे हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात पोहोचला असून त्यांच्या मंजुरीनंतर ही तैलचित्रे महापालिकेच्या मुख्यालयात व सभागृहात झळकणार आहेत.

महापालिका प्रशासनाने तयार केलेल्या प्रस्तावानुसार, मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात दिवंगत अजितदादा पवार व दिवंगत लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्यात येणार आहेत. तसेच, महापालिका सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावण्यात येणार आहे. यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार थेट पद्धतीने काम देण्यास



मान्यता घेण्यात येणार आहे

यापूर्वी महापालिका सभेने अजितदादा पवार व लक्ष्मणभाऊ जगताप यांची तैलचित्रे लावण्यास मान्यता दिली होती. त्यानंतर महापौरांकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र सभागृहात लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार तिन्ही तैलचित्रे बसविण्याची प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली आहे.

प्रस्तावानुसार, चित्रकार सुनील शेगावकर यांच्याकडून ही तैलचित्रे तयार करण्यात येणार आहेत. अजितदादा पवार व लक्ष्मणभाऊ जगताप यांची प्रत्येकी ८ बाय ५ फूट, तर अहिल्यादेवी होळकर यांचे ६ फूट ६ इंच बाय ४ फूट आकाराचे तैलचित्र तयार करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक खर्च महापालिकेच्या अंदाजपत्रकातील विशेष योजनेतून करण्यात येणार आहे. महापालिकेच्या मुख्यालयात यापूर्वी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्रही याच चित्रकाराने तयार करूनदिले असून त्याच्या धर्तीवर ही तैलचित्रेही उभारली जाणार आहेत.

# डेंग्यू, मलेरियाविरुद्ध महापालिकेची व्यापक प्रतिबंध मोहीम

## स्वच्छता, डास प्रतिबंधावर विशेष भर; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया तसेच इतर संसर्गजन्य आजारांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून शहरभर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी स्वच्छता, जनजागृती आणि डास नियंत्रणाच्या विविध मोहिमा प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत.

पावसाळ्यात साचलेले पाणी, अस्वच्छ परिसर तसेच दूषित अन्न व पाण्यामुळे संसर्गजन्य आजारांचा प्रसार होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचणार नाही याची काळजी घेणे, पिण्याचे पाणी उकळून किंवा शुद्ध करून वापरणे तसेच अन्नपदार्थ नेहमी झाकून ठेवावे असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले.

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी पाण्याच्या टाक्या, कुलर, फुलदाण्या, टायर तसेच इतर पाणी साचणाऱ्या वस्तूंची नियमित स्वच्छता करावी. नागरिकांनी आठवड्यातून किमान एकदा अशा ठिकाणांची तपासणी करून पाणी साचू देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेकडून डासांच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी अळीनाशक औषधांची फवारणी, डासांचा नायनाट करण्यासाठी धूरफवारणी (फॉगिंग), घराघरांत सर्वेक्षण, जनजागृती मोहीम तसेच आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक औषध फवारणी नियमितपणे केली जात आहे. याशिवाय महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये संशयित रुग्णांची तपासणी आणि आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महापौर रवि लांडगे म्हणाले, "पावसाळ्यात संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी महापालिकेच्या उपाययोजनांसोबतच नागरिकांचे सक्रिय सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. ताप, अंगदुखी, उलट्या, जुलाब किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन वैद्यकीय सल्ला घ्यावा. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेच्या सवयी अंगीकारून पाणी साचू न देण्याची काळजी घेतल्यास संसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल."

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले, "पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असल्याने प्रत्येक नागरिकाने स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपायांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. घर व परिसरात पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे आणि ताप किंवा इतर संशयास्पद लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महापालिका प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवत असून नागरिकांनीही सक्रिय सहकार्य करून निरोगी, स्वच्छ पिंपरी चिंचवड घडविण्यास हातभार लावावा.

डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून स्वच्छतेची सुरुवात करणे गरजेचे आहे. परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साचू न देणे, डासांची उत्पत्ती रोखणे तसेच वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे हीच सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरभर प्रतिबंधात्मक उपाय सातत्याने राबविण्यात येत असून नागरिकांच्या सहभागामुळेच निरोगी आणि स्वच्छ पिंपरी चिंचवडचे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साध्य होईल असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यावेळी म्हणाले.

# रावेत पोलिसांचे प्रसंगावधान! आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाला मृत्यूच्या दारातून वाचवले

## ऑनलाइन जुगारामुळे मानसिक तणाव; पोलिसांच्या धाडसी हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला, समुपदेशनानंतर कुटुंबीयांच्या ताब्यात



### पोलिसांच्या प्रसंगावधानाने वाचले प्राण

**» रावेत येथील लंडन ब्रिजवरून नदीत उडी मारण्याच्या तयारीत असलेल्या २० वर्षीय तरुणाचे प्राण रावेत पोलिसांनी धाडसाने वाचवले. रात्री गस्तीदरम्यान पोलिस अंमलदार आशिष बोटके आणि दशरथ सदगीर यांनी तरुणाला पुलाच्या संरक्षक जाळीच्या आत कठड्यावर उभे पाहताच तातडीने घटनास्थळी धाव घेतली. प्रथम त्याची समजूत काढत शांत केले. योग्य संधी साधून त्याचे लक्ष विचलित करत त्याला मागे ओढून सुरक्षित ठिकाणी आणले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक ऋषीकेश घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

"आई... मी आता नदीत उडी मारतोय..." असे म्हणत व्हिडीओ कॉलवर नदीचे दृश्य दाखवणारा २० वर्षीय तरुण रावेत येथील लंडन ब्रिजच्या संरक्षक जाळीच्या आत कठड्यावर उभा होता. त्याचवेळी गस्तीवरील पोलिसांनी प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली. प्रथम त्याची समजूत काढत त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर योग्य संधी साधून त्याला मागे ओढत मृत्यूच्या दारातून अक्षरशः खेचून आणले. रावेत पोलिसांच्या धाडसी कारवाईमुळे तरुणाचे प्राण वाचले.

प्राथमिक चौकशीत संबंधित तरुणाने मोबाईलवरील ऑनलाइन जुगारात सुमारे १५ हजार रुपये गमावल्याची माहिती समोर आली. आर्थिक नुकसान आणि मानसिक तणावामुळे त्याने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे युवकांमध्ये वाढत असलेल्या ऑनलाइन जुगाराच्या व्यसनाबाबत पुन्हा चिंता व्यक्त होत आहे. अल्पावधीत मोठा पैसा मिळविण्याच्या मोहापायी अनेक तरुण आर्थिक अडचणीत सापडत असून त्याचा मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहे. तज्ज्ञांकडून वेळेवर समुपदेशनाची गरज अधोरेखित केली जात आहे.

संबंधित तरुण मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील असून सध्या तो हिंजवडी येथील लक्ष्मी चौक परिसरात वास्तव्यास आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक ऋषीकेश घाडगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रावेत पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लंडन ब्रिज परिसरात रात्री गस्त घालत असताना पोलिस अंमलदार आशिष बोटके आणि दशरथ सदगीर यांना पुलाच्या कठड्यावर एक तरुण संशयास्पद अवस्थेत उभा असल्याचे दिसले. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत त्याच्याशी संवाद साधला. त्यावेळी तो आत्महत्येच्या उद्देशाने नदीत उडी मारण्याच्या तयारीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

दरम्यान, संबंधित तरुणाने आपल्या आईला व्हिडीओ कॉल करून नदीचे दृश्य दाखवत आपण नदीत उडी मारणार असल्याचे सांगितले. ही माहिती मिळताच त्याची आई रावेतच्या दिशेने निघाली. तोपर्यंत पोलिसांनी संयम राखत त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. संवाद सुरू असतानाच पोलिसांनी त्याचे लक्ष दुसरीकडे वळवले आणि योग्य क्षण साधून मोठ्या धाडसाने त्याला मागे ओढून सुरक्षित बाजूला आणले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

प्राथमिक चौकशीत, मोबाईलवरील ऑनलाइन जुगारात सुमारे १५ हजार रुपये गमावल्याने संबंधित तरुण मानसिक तणावात आला होता. त्यातूनच त्याने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्याचे समोर आले. या घटनेमुळे युवकांमध्ये वाढत्या ऑनलाइन जुगाराच्या व्यसनाचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक तसेच मानसिक संकटाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे

घटनास्थळी पोहोचलेल्या आईने मुलाला सुखरूप पाहताच सुटकेचा निश्वास सोडला. त्यानंतर पोलिसांनी संबंधित तरुणाचे समुपदेशन करून त्याला कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. पोलिसांच्या या धाडसी आणि प्रसंगावधान राखणाऱ्या कामगिरीमुळे एका तरुणाचे प्राण वाचले आहेत. त्यांच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# पुण्याची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी 9 हजार कोटी!

## राज्य सरकार आणि पुणे महानगरपालिकेने तब्बल 9 हजार कोटी रुपयांच्या 'उच्च क्षमता द्रुतगती मार्ग' प्रकल्पाला अव्वल प्राधान्य दिले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे:'शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी 'उच्च क्षमता द्रुतगती मार्ग' (एचसीएमटीआर) प्रकल्पाला प्राधान्य देण्यात येणार असून, पावसाळा संपल्यानंतर या प्रकल्पाला वेगाने सुरुवात होईल. या प्रकल्पासाठी केवळ १५ टक्के खासगी जागांचे भूसंपादन करावे लागणार असून, उर्वरित जागा या राज्य तसेच केंद्र सरकारच्या मालकीच्या असल्याने अडचण येणार नाही. या प्रकल्पाचा सुधारित प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार केला जाणार आहे.

गेल्या आठवड्यात राज्य सरकारने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शहरात 'एचसीएमटीआर', वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) तसेच भुयारी मार्ग करण्याचे नियोजन केले असून, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी हे तीन प्रकल्प मार्गी लावण्याचा संकल्प राज्य सरकारने केला असून, त्या दृष्टिने पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे.



वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या या तिन्ही प्रकल्पांसंदर्भात महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी बैठक घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना आयुक्त राम यांनी तिन्ही उपाययोजनांपैकी 'एचसीएमटीआर' प्रकल्पाला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगितले. सुमारे ९ हजार कोटी रुपये खर्चाच्या या ३६ किलोमीटर लांब व २४ मीटर रुंद उन्नत मार्गाचे काम पावसाळा संपल्यानंतर तातडीने सुरू करण्याचा पालिकेचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले.

आयुक्त राम म्हणाले, "एचसीएमटीआर' प्रकल्पासाठी केवळ १५ टक्के जागेचेच संपादन करावे लागणार आहे. सुमारे ६० टक्के जमीन शासनाची असून, २५ टक्के भागावर सध्या रस्ते अस्तित्वात आहेत. विद्यमान आराखड्यात मेट्रो मार्गाशी १० ठिकाणी 'क्रॉस सेक्शन' होत असून त्या बाबत मेट्रोशी चर्चा केली जाईल. शहराच्या वाहतुकीला गती देण्यासाठीच्या तिन्ही प्रकल्पांपैकी हा प्रकल्प सर्वांत आधी पूर्ण होऊ शकतो. त्यामुळेच या प्रकल्पाचा सुधारित आराखडा तयार करून निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल. काही टप्प्यात (पॅकेजेस) हे काम केले जाईल.' या मार्गावर पथकर (टोल) लावण्यात येणार नाही,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

### पुण्यात 'रिंग रोड' ८३ किलोमीटरचा

» 'वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी दुसरे प्राधान्य वर्तुळाकार रस्त्याला (रिंग रोड) दिले जाणार आहे. यासाठी सुमारे २७ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, ८३ किलोमीटर लांबीचा हा रस्ता असणार आहे. 'रिंग रोड' चा सर्वाधिक भाग सध्या महापालिकेच्या हद्दीत येतो.हा रस्ता तयार करण्यासाठी ४४ गावांमधील भूसंपादन करावे लागणार आहे,' असे आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले. 'प्रकल्पासाठी जागा ताब्यात घेताना जागा मालकांच्या अपेक्षा आणि भरपाईचे दर या बाबत पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात येईल.

### एचसीएमटीआरला प्राधान्य

» पुणे शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीवर दीर्घकालीन उपाय म्हणून ३६ किलोमीटर लांबीचा 'हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रूट' (एचसीएमटीआर) प्रकल्प प्राधान्याने राबविण्यात येणार आहे. सुमारे ९ हजार कोटी रुपयांच्या या उन्नत मार्गाचे काम पावसाळ्यानंतर सुरू करण्याचे नियोजन आहे. सुधारित डीपीआर तयार करून टप्प्याटप्प्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या मार्गामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक भार कमी होऊन पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण दिशेतील प्रवास अधिक जलद व सुलभ होण्याची अपेक्षा महापालिकेने व्यक्त केली आहे.

### आवश्यकतेनुसार बोगदेही करणार

» 'जागा उपलब्ध होत नसल्याने काही महिन्यांपूर्वी 'पाताललोक' (भुयारी मार्ग) करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. हा प्रकल्प आवश्यकतेनुसारच राबवला जाईल. 'एचसीएमटीआर', 'रिंग रोड' व बोगदे तिन्ही प्रकल्प एकमेकांना जोडलेले असतील. या तिन्ही प्रकल्पांसाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक व प्रकल्प सल्लागार नेमले जातील,' असेही राम यांनी स्पष्ट केले.

# 'हरित पुणे'च्या दाव्यांना धक्का; महापालिका उद्यान विभागातील 90 टक्के पदे रिक्त

## वृक्षसंवर्धन, अवैध वृक्षतोड रोखण्यावर परिणामाचा आरोप; तातडीने भरतीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

'हरित पुणे'ची घोषणा करीत शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि हरित क्षेत्र वाढविण्याचे दावे केले जात असताना दुसरीकडे महापालिकेच्या उद्यान विभागातच तब्बल ९० टक्के पदे रिक्त असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शहरात वाढते काँक्रिटीकरण, अवैध वृक्षतोडीच्या तक्रारी आणि पावसाळ्यात झाडे पडण्याच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ही बाब अधिक गंभीर मानली जात आहे. माहिती अधिकारातून ही माहिती मिळाल्याचा दावा करीत सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना पत्र पाठवून तातडीने पदभरती करण्याची मागणी केली आहे.



वेलणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्यान विभागात उद्यान निरीक्षकांची आठ मंजूर पदे आहेत. मात्र, त्यापैकी केवळ एकच पद भरलेले असून, सात पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे मिस्त्रींच्या ३३ मंजूर पदांपैकी फक्त चार कर्मचारी कार्यरत असून, तब्बल २९ पदे अद्याप रिक्त आहेत. म्हणजेच, या दोन्ही संवर्गातील एकूण ४१ पदांपैकी केवळ पाच पदांवर कर्मचारी कार्यरत असून, जवळपास ९० टक्के पदे रिक्त असल्याचे चित्र आहे. उद्यान निरीक्षकांवर शहरातील उद्याने, रस्त्यालगतचे हरितपट्टे आणि वृक्षांची नियमित पाहणी करण्याबरोबरच वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, शास्त्रोक्त छाटणी, पाणीपुरवठा, कर्मचाऱ्यांचे नियोजन, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण तसेच वृक्षतोड आणि पुनर्लागवडीच्या कामांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असते. तर, मिस्त्री हे प्रत्यक्ष कामांचे पर्यवेक्षण करून माळी आणि कामगारांकडून ही कामे करवून घेतात. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने ही सर्व कामे प्रभावीपणे कशी पार पडत असतील, असा सवाल वेलणकर यांनी उपस्थित केला आहे.

> **उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, ९० टक्के पदे रिक्त आहेत, असे काही नाही. पदोन्नती देऊन जागा भरण्यात आलेल्या आहेत. जी पदे रिक्त आहेत. त्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आली असून, त्यांच्या मान्यतेनंतर लवकरच ही रिक्त पदे भरली जातील.**
>
> - अशोक घोरपडे, उद्यान विभागप्रमुख, पुणे महापालिका

# रस्त्यावर उतरून आंदोलन केल्यास थेट गुन्हा

## अचानक गर्दी जमवून वाहतूक विस्कळीत केल्यास खैर नाही; पोलिसांनी आंदोलनासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसराचा दिला पर्याय.

**पुणे | प्रतिनिधी**

वारंवार रस्त्यावर उतरून होणाऱ्या आंदोलनाबाबत पुणे पोलिसांनी आता कठोर भूमिका घेतली आहे. एफसी रोड, जेएम रोड, बालगंधर्व चौक, अलका चौक आणि खंडोजीबाबा चौक आदी प्रमुख ठिकाणी आंदोलनास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. एमपीएससी परीक्षांसंदर्भातील मागण्यांसाठी विद्यार्थी या प्रमुख ठिकाणी सतत आंदोलन करत असतात. आता त्यांना परवानगी दिलेल्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलन करता येणार आहे.

तसेच आंदोलनाची घोषणा किंवा आवाहन सोशल मीडियावर करण्यापूर्वीही पोलिसांची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी एमपीएससी आंदोलनाच्या प्रतिनिधींशी झालेल्या बैठकीत ही भूमिका स्पष्ट केली. सोशल मीडियावर आंदोलनाचे आवाहन करून अचानक शेकडो विद्यार्थी रस्त्यावर उतरतात.



### जिल्हाधिकारी कार्यालय परिसर आंदोलनासाठी निश्चित

**» एमपीएससीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलन करण्याची मुभा देण्यात आली आहे. ओंकारेश्वर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्यासही पोलिसांनी तत्त्वतः सहमती दर्शविली आहे. मात्र, शहरातील प्रमुख चौकांमध्ये रस्ते अडवून नागरिकांना वेठीस धरणारे आंदोलन यापुढे सहन केले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले असून लोकशाही मार्गाने आंदोलनासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

त्यामुळे वाहतूक विस्कळीत होते आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. यापुढे कोणतेही आंदोलन, मोर्चा, धरणे किंवा रास्ता रोको करण्यापूर्वी पोलिसांची परवानगी घेणे अनिवार्य असेल, असे त्यांनी सांगितले. पोलिसांच्या मते, गेल्या काही वर्षांत एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनांमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फटका बसला.

त्यामुळे या संवेदनशील भागांत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची तयारी सुरू आहे. त्यानंतर या परिसरात विनापरवानगी जमाव जमविणे किंवा आंदोलन करण्यावर बंदी असेल. एमपीएससी परीक्षेतील ऑफलाइन परीक्षा, भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि रखडलेल्या भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याच्या मागण्यांसाठी विद्यार्थी सातत्याने आंदोलन करत आहेत.

### प्रमुख चौकांमध्ये आंदोलनास बंदी

**» पुणे पोलिसांनी एफसी रोड, जेएम रोड, बालगंधर्व चौक, अलका चौक आणि खंडोजीबाबा चौक या प्रमुख ठिकाणी आंदोलन करण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. या ठिकाणी वारंवार होणाऱ्या आंदोलनांमुळे वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण होत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची तयारी सुरू आहे. या आदेशानंतर विनापरवानगी जमाव जमविणे किंवा आंदोलन करणे दंडनीय ठरणार आहे.**

### सोशल मीडियावर आवाहनासाठीही परवानगी आवश्यक

**» कोणतेही आंदोलन, मोर्चा किंवा धरणे आयोजित करण्यापूर्वी पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. याशिवाय सोशल मीडियावर आंदोलनाचे आवाहन किंवा घोषणा करण्यासाठीही पोलिसांची परवानगी घ्यावी लागणार आहे. विनापरवानगी पोस्ट करून गर्दी जमविणे किंवा प्रतिबंधित ठिकाणी आंदोलन केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.**

---

# पाटस भक्तीरंगात न्हाऊन निघाले; संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे टाळ-मृदंगाच्या गजरात स्वागत

## रोटी घाटाच्या प्रवासासाठी वारकऱ्यांची विशेष काळजी; गोड जेवण, चहा-नाश्त्यासह ग्रामस्थांकडून सेवाभावाचा आदर्श

**पुणे | प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा मंगळवारी (दि. १४) सकाळी पाटस (ता. दौंड) येथे दाखल होताच ग्रामस्थांनी टाळ-मृदंगाच्या गजरात, फुलांची उधळण करत आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात उत्स्फूर्त स्वागत केले. वरवंड ते उंडवडी हा पालखी सोहळ्यातील सर्वात मोठा टप्पा असल्याने पुढील रोटी घाटाचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी पाटसकरांनी वारकऱ्यांसाठी पारंपरिक गोड जेवणासह चहा-नाश्त्याची उत्तम व्यवस्था केली.

रविवारी (दि. १२) यवत येथे पहिला तर सोमवारी (दि. १३) वरवंड येथे दुसरा मुक्काम करून मंगळवारी सकाळी ६ वाजता आरतीनंतर पालखी सोहळा बारामती तालुक्यातील उंडवडी गवळ्याच्या दिशेने पुढील प्रवासासाठी रवाना झाला. वरवंडपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावरील भागवतवाडी येथे सकाळी आठच्या सुमारास पालखीचे आगमन झाले. येथे वारकऱ्यांसाठी चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. सुमारे १५ मिनिटांच्या विश्रांतीनंतर पालखी सोहळा पाटसच्या मुख्य चौकात सकाळी सव्वा नऊच्या सुमारास पोहोचला. ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने पालखीचे स्वागत करत भक्तिभावाचे दर्शन घडविले.



पालखी सोहळ्यामुळे पाटस परिसरात विविध दिंड्यांचा मुक्काम झाल्याने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाले होते. सालाबादप्रमाणे पाटस व्यापारी संस्था, आरोग्य विभाग, पाटस व कुसेगाव ग्रामस्थ तसेच अनेक छोटे-मोठे व्यावसायिक यांनी चहा, नाश्ता, खाऊ व इतर सेवा देत वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या अनुराधा सत्वशील शितोळे, पंचायत समिती सदस्य शिवाजीबापू ढमाले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सागर शितोळे, ज्येष्ठ नागरिक डॉ. मधुकर आव्हाड, माजी ग्रामपंचायत सदस्य तानाजी केकाण, संभाजी देशमुख, स्वप्नील भागवत, गणेश चव्हाण, उद्योजक राहुल आव्हाड, ग्रामसेवक दीपक बोरावके, ग्रामसेवक भाऊसाहेब कांबळे, कवी सुधीर पानसरे, अशोकराव पानसरे, वरवंड-पाटस आरोग्य विभागाचे कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

### रोटी घाटाचा सर्वात मोठा प्रवास

**» वरवंड ते उंडवडी हा पालखी सोहळ्यातील सर्वात लांब आणि कष्टदायक टप्पा मानला जातो. त्यामुळे वारकऱ्यांना पुढील प्रवासासाठी आवश्यक ऊर्जा मिळावी, यासाठी पाटस येथे विशेष विश्रांती आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली. सकाळी आरतीनंतर पालखी सोहळा वरवंडहून मार्गस्थ झाला. भागवतवाडी येथे चहा-नाश्त्यासाठी अल्प विश्रांती घेतल्यानंतर पालखी पाटसमध्ये दाखल झाली. येथे श्री नागेश्वर मंदिरात दर्शनानंतर वारकऱ्यांनी भोजन करून पुढील प्रवास सुरू केला. या नियोजनामुळे वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुखकर झाला.**